आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जुलै २०२४ - बुधवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- घटस्फोटित मुस्लिम महिलांना पतीकडून पोटगी मागण्याचा अधिकार असल्याचं सर्वोच्च न्यायालयाकडून स्पष्ट
- ऑस्ट्रिया दौऱ्यात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं तिथल्या कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी निमंत्रण
- महाराष्ट्रात, आरक्षणाच्या मुद्द्यावरून विधिमंडळात गदारोळ, गोंधळातच पुरवणी मागण्या मंजूर / दोन्ही सभागृहांचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब
- उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्यापासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर

**आणि**

- तिसऱ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारताचा झिम्बाब्वेवर २३ धावांनी विजय

**<><><><><>**

घटस्फोटित मुस्लिम महिलांना पतीकडून पोटगी मागण्याचा अधिकार आहे, असं सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केलं आहे. घटस्फोटाची याचिका न्यायप्रविष्ट असताना फौजदारी कारवाई संहितेच्या कलम १२५ नुसार आणि घटस्फोट झाल्यानंतर विवाह हक्क संरक्षण कायद्यानुसार मुस्लिम महिलेला पोटगी मागण्याचा अधिकार असल्याचं न्यायालयाने म्हटलं आहे.

सर्वोच्च न्यायालयात एका व्यक्तीनं घटस्फोटित पत्नीला फौजदारी कारवाई संहितेच्या कलम १२५ नुसार हंगामी पोटगी देण्याच्या विरोधात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर न्यायमूर्ती बी.व्ही नागरत्ना आणि ऑगस्टिन जॉर्ज मसीह यांच्या खंडपीठासमोर सुनावणी झाली. त्यावेळी खंडपीठानं मुस्लिम महिलेला पोटगीचा अधिकार असल्याचं स्पष्ट करत सदर याचिका फेटाळून लावली. मुस्लिम

महिला अधिनियम १९८६, हा धर्मनिरपेक्ष कायद्यापेक्षा वरचढ होऊ शकत नाही, असंही न्यायालयानं नमूद केलं.

<><><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि ऑस्ट्रियाचे अध्यक्ष कार्ल नेहॅमर यांनी आज व्हिएन्ना इथल्या हॉफबर्ग पॅलेस इथं एका संयुक्त बैठकीत भारतीय आणि ऑस्ट्रियाच्या प्रसिद्ध कंपन्यांच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांना संयुक्तपणे संबोधित केलं. पायाभूत सुविधा, अक्षय ऊर्जा, हरित क्षेत्रं, नवीन आणि उदयोन्मुख तंत्रज्ञान, फिनटेक, स्टार्ट-अप्स, नावीन्य यासह विविध क्षेत्रात भारतीय आणि ऑस्ट्रियन कंपन्यांमधील क्षमतांबाबत संबोधित केलं. मोदी यांनी ऑस्ट्रियन कंपन्यांना भारतात गुंतवणूक करण्यासाठी निमंत्रणही दिलं.

<><><><><>

देशभरात डेंग्यूच्या प्रादुर्भावाला आळा घालण्याच्या दृष्टीनं केंद्रसरकार विविध योजना तयार करीत असून राज्यसरकारांबरोबरही संपर्कात आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री जगतप्रकाश नड्डा यांनी आज नवी दिल्लीत पत्रकारपरिषदेत ही माहिती दिली. डेंग्यू विषयी मदत, मार्गदर्शन आणि माहितीसाठी एक विशेष हेल्पलाईन केंद्रीय आरोग्यमंत्रालय सुरु करणार असून राज्यसरकारांनी देखील अशा हेल्पलाईन सुरु कराव्या असं त्यांनी सांगितलं. केंद्रीय रुग्णालयांनी डेंग्यूप्रतिबंध आणि निवारणासाठी सज्ज रहावं, तसंच संबंधित विभागांनी आपसात ताळमेळ राखून अंमलबजावणी करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. देशभरात डेंग्यू प्रादुर्भाव आणि प्रतिबंध या संबंधातल्या स्थितीचा आढावा घेण्यासाठी नड्डा यांनी एक बैठक घेतली. त्यानंतर ते पत्रकारपरिषदेत बोलत होते.

<><><><><>

उडदाचे भाव उतरवण्यासाठी सरकारनं सातत्यानं केलेल्या प्रयत्नांना यश आलं आहे. इंदूरच्या बाजारपेठेत तीन पूर्णांक १२ टक्के तर दिल्लीच्या

बाजारपेठेत एक पूर्णांक ८ टक्के इतकी घसरण झाली. यंदा तब्बल पाच लाख सदतीस हजार लाख हेक्टर्स इतक्या शेतीक्षेत्रावर उडदाचं पीक घेण्यात आलं. पर्जन्यमान चांगलं राहील तर यंदा महाराष्ट्रासह मध्य प्रदेश, आंध्र प्रदेश,उत्तर प्रदेश,राजस्थान,तामिळनाडू या राज्यात उडदाचं पीक जोमानं येण्याची शक्यता आहे.

**<><><><>**

राज्य सरकारी कर्मचाऱ्यांच्या महागाई भत्त्यात ४ टक्के वाढ करण्याचा निर्णय महाराष्ट्र सरकारनं घेतला आहे. आज हा शासन निर्णय जारी झाला असून, यावर्षीच्या जानेवारी महिन्यापासून ही वाढ मिळणार आहे. या निर्णयाचं राज्य राजपत्रित अधिकारी-कर्मचारी महासंघानं स्वागत केलं आहे.

**<><><><>**

पाठ्यपुस्तकात केलेला बदल हा फक्त इयत्ता तिसरी आणि सहावी साठीच आहे असं CBSE  मंडळानं जाहीर केलं आहे. इतर इयत्तांसाठी मागच्या वर्षी राबवलेला जुनाच अभ्यासक्रम लागू असणार आहे, अशा सूचना शाळांना दिल्याचं मंडळानं म्हटलं आहे.

**<><><><>**

उत्तराखंड इथं चमोली जिल्ह्यात बद्रीनाथ राष्ट्रीय महामार्गावर पाताळगंगा लांगसी बोगद्याजवळ मोठ्या प्रमाणावर दरडी कोसळल्यानं वाहतुकीचा प्रचंड खोळंबा झाला आहे. बद्रीनाथच्या सगळ्या यात्रेकरूंना सुरक्षित जागी थांबण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

**<><><><>**

विधिमंडळ अधिवेशनात आजच्या दिवशी आरक्षणाच्या मुद्द्यावरून दोन्ही सभागृहांमध्ये गदारोळ झाला. विरोधक आणि सत्ताधारी पक्षाच्या आमदारांच्या

घोषणाबाजीतच दोन्ही सभागृहांमध्ये पुरवणी मागण्या मंजूर करण्यात आल्या. त्यानंतर विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी प्रयत्न करूनही शांतता प्रस्थापित न झाल्यानं विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं. विधानसभेत काही विधेयकं मंजूर झाली. त्यानंतर विधानसभेचं कामकाजही दिवसभरासाठी थांबवण्यात आलं.

मराठ्यांना ओबीसीमध्ये आरक्षण द्यावं का, यावर विरोधी पक्षानं भूमिका स्पष्ट करावी, अशी मागणी सत्ताधारी पक्षाच्या सदस्यांनी विधानसभेत केली. सत्ताधारी आक्रमक राहिल्यानं आधी तीन वेळा काही काळ कामकाज तहकूब करावं लागलं.

विधानपरिषदेतही असंच चित्र राहिलं. मराठा आणि ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल बोलावलेल्या सर्वपक्षीय बैठकीला विरोधक गैरहजर राहिल्याचा मुद्दा प्रवीण दरेकर यांनी मांडला. त्यावर दोन्ही बाजूंच्या आमदारांनी हौद्यात उतरून प्रचंड गोंधळ आणि घोषणाबाजी केली.

**<><><><><>**

सरकारनं स्वतःची कातडी वाचवण्यासाठी मराठा आरक्षणावर चर्चा न करता उपसभापतींशी संगनमत करून विधानपरिषदेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब केल्याचा आरोप विधानपरिषदेतले विरोधी पक्षनेते अंबादास दानवे यांनी केला. या मुद्द्यावर चर्चा न करता कामकाज चालू न देणं ही भूमिका चुकीची आहे. सरकारने दोन्ही घटकांशी चर्चा करायला हवी होती, असं मत त्यांनी नोंदवलं.

सभागृहाचं कामकाज तहकूब केल्याच्या विरोधात विरोधी पक्षांनी विधानभवनाच्या पायऱ्यांवर घोषणाबाजी करत निषेध नोंदवला.

आरक्षणाबाबत सरकारनं निर्णय घेणं अपेक्षित आहे, मात्र निर्णय न घेता सरकार आमच्याकडे बोट दाखवत आहे, अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी केली. सरकारनं ९४ हजार कोटी

रुपयांच्या पुरवणी मागण्या मांडल्या, त्याला आम्ही विरोध करू, याची कल्पना आल्यानं त्यांनी सभागृहात गोंधळ घातला, असा आरोपही पाटील यांनी केला.

आरक्षण प्रश्नी सरकारला निर्णय घेता येत नसेल तर सरकारनं पायउतार व्हावं, अशी टीका विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केली.

**<><><><><>**

उपराष्ट्रपती जगदीप धनखड उद्यापासून दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येत आहेत. उद्या संध्याकाळी राज्य विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांना ते संबोधित करतील. परवा नरसी मोनजी व्यवस्थापन संस्थेच्या प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांपुढं त्यांचं भाषण होणार आहे.

**<><><><><>**

हरारे इथं आज झालेल्या तिसऱ्या टी-ट्वेंटी क्रिकेट सामन्यात भारतानं झिम्बाब्वेवर २३ धावांनी विजय मिळवला. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना भारतानं निर्धारित २० षटकात ४ गडी गमावून १८२ धावा केल्या. कर्णधार शुभमन गिलनं सर्वाधिक ६६ धावा केल्या. ऋतुराज गायकवाडनं २८ चेंडूत ४९, तर यशस्वी जयस्वालनं ३६ धावा केल्या.

या धावसंख्येचा पाठलाग करताना झिम्बाब्वेचा संघ निर्धारित २० षटकात ६ गडी गमावून १५९ धावाच करु शकला. डीयॉन मायर्सनं नाबाद ६५ धावा केल्या. भारतातर्फे वॉशिंग्टन सुंदरनं ३, तर आवेश खाननं २ गडी बाद केले.

**<><><><><>**

राष्ट्रीय पातळीवर आयोजित करण्यात येणाऱ्या फूटबॉल स्पर्धेच्या विजयचिन्हांचं अनावरण आज राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांच्या हस्ते झालं. नवी दिल्लीच्या राष्ट्रपती भवनात झालेल्या कार्यक्रमात ड्युरँड चषक, राष्ट्रपती चषक

आणि सिमला चषक स्पर्धांच्या विजयचिन्हांचा समावेश आहे. ड्युरँड चषक सामन्यांमधे भाग घेणाऱ्या खेळाडूंना त्यांनी यावेळी शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीत नामवंत अर्थतज्ज्ञांशी संवाद साधतील. आगामी केंद्रीय अर्थसंकल्पासाठी या अर्थतज्ज्ञांच्या सूचना आणि मतं उपयुक्त ठरणार आहेत. अर्थतज्ज्ञांच्या बरोबरीने प्रधानमंत्री विविध क्षेत्रातल्या मान्यवरांना देखील भेटणार आहेत.

**<><><><><>**

उत्तरप्रदेशातल्या पिलिभीत आणि लखीमपूर खेरी जिल्ह्यात पुरामुळे शेतजमिनीचं नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकार जमिनीचे पट्टे देणार आहे. उत्तरप्रदेशाचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी आज पिलिभीत आणि लखीमपूर खेरी जिल्ह्यात सुरू असलेल्या बचावकार्याचा आढावा घेतला, त्यावेळी त्यांनी ही घोषणा केली. नद्या उथळ झाल्याने त्यांचं खोलीकरण करण्याची गरज असल्याचं योगी आदित्यनाथ  यावेळी म्हणाले.

अति मुसळधार पावसामुळे लखिमपूर खेरी, पिलिभीत, श्रावस्ती, कुशीनगर, बलरामपूर आणि गोंडा जिल्ह्यात शेतजमिनींचं मोठ्या प्रमाणात नुसकान झाल्याचं आकाशवाणीच्या वार्ताहराने सांगितलं.

**<><><><><>**

विविध प्रकल्पांच्या निविदा प्रक्रियेत भ्रष्टाचार केल्याच्या आरोपावरून सीएसआयआर, अर्थात वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे वरिष्ठ संशोधक आणि संचालक, डॉ राकेश कुमार,  तसंच नीरी, अर्थात राष्ट्रीय हवामान तंत्रज्ञान अभियंता संस्था नागपूरचे तत्कालीन संशोधन प्रमुख डॉ, रितेश विजय, सहाय्यक संचालक डॉ. आत्या काप्ली आणि अन्य चार शास्त्रज्ञ आणि पाच खासगी कंपन्यांसह दहा आरोपींविरुद्ध सीबीआयनं तीन स्वतंत्र गुन्हे नोंदवले आहेत.

आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता

१० जुलै २०२४ - बुधवार

**//<><><><><>//**